| | | |
|---|---|---|
| | **जिल्हा परिषद रत्नागिरी**<br>**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन**<br>**बांधकाम विभाग चिपळूण** | |

| | | | |
|---|---|---|---|
| दुरध्वनी क्रमांक - (०२३५२) २२२३६८ | e-mail : eezpchiplun@gmail.com | | |
| जा.क्र.रजिप/बांधकाम चिपळूण/ए-१/टेंडर/ १९७५ /२०२२ | दिनांक | ३०.०५.२०२३ | |

प्रति,

मा.सरपंच,

ग्रामपंचायत कार्यालय शिरगांव,

तालुका :- चिपळूण जिल्हा :- रत्नागिरी

विषय :- <u>कामाचे कार्यारंभ आदेश.....</u>
**शिरगांव वेताळवाडी अंतर्गत पाखाडी बांधणे ता. चिपळूण जि.रत्नागिरी**

**लेखाशिर्ष:- डोंगरी विकास कार्यक्रम सन २०२२-२३**

**अंदाजपत्रकिय रक्कम :- ५,००,०००/-**

**निविदा रक्कम :- ४,१६,४७०/-**

**निविदा मंजूर रक्कम :- ४,१६,४७०/-**

**महोदय,**

उपरोक्त कामांची निविदा, **निविदा दराने** मंजूर झालेली असल्याने तसेच रक्कम रुपये **५००/-** च्या मुद्रांकावर सदर कामाचा करारनामा पूर्ण करुन दिल्याने काम सुरु करण्यास या द्वारे आदेश देण्यात येत आहेत. तरी उप अभियंता **चिपळूण** यांचेकडून कामाची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे कामाला सुरुवात करावी. कामाची मुदत पावसाळा वगळून **दि.१५ जानेवारी २०२४** पर्यंत असून ती या आदेशाच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

ग्रामपंचायत सदर काम महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन आदेश क्र. झेडपीए-२०१५/ प्र.क्र.१०/ वित्त-९ दि.२५/०३/२०१५ अन्वये एजन्सी म्हणून करावयाचे आहे. तसेच ग्रामपंचायतीने स्वत: मजूर लावून व साहित्य खरेदी करुन (डिपार्टमेंट पध्दतीने) काम करणार असल्याने eTendering माध्यमातून पोट मक्तेदार नेमता येणार नाही. परंतु यासाठी जे साहित्य खरेदी करावयाचे आहे ते मात्र रुपये एक लक्ष पेक्षा जास्त किंमतीचे असल्यास प्रत्येक बाब e-Tendering माध्यमातून निविदा मागवून करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिपर २०००/प्र.क्र.८३७/३५, मंत्रालय, मुंबई दि.०८ मे २००२ चे परिपत्रकानुसार मक्तेदाराने सोपविलेले कामाचा व ते पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. सदर विमा प्रत्यक्ष काम सुरु करणेपुर्वी उतरविणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. तसेच गौणखनिज फी शासनास वेळच्या वेळी जमा करणे आवश्यक आहे तसेच काम सुरु करण्यापूर्वी कामाचे ठिकाणी माहितीफलक लावण्यात यावा. कामाचे देयक अनुदान उपलब्धते नुसार देण्यांत येईल. देयकातून शासकीय नियमानुसार वस्तू व सेवा कराची कपात करणेत येईल. तसेच गौणखनिज व वस्तू व सेवा कर इतर कर शासन नियमानुसार मक्तेदाराला आदा करणेत येईल. कामातील उणीवांच्या दुरुस्ती कालावधी (Defect Liability Period हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२, मुंबई ४०० ०३२ दि.१४ जानेवारी २०१९ अन्वये दोन वर्षे निर्धारीत करणेत येईल.

**सदर कार्यारंभ आदेश हा जिल्हा परिषदेच्या http://www.zpratnagiri.org या सांकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२३०६०६९१२९४ हा आहे.**

आपला विश्वासु,

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग चिपळूण**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

प्रत :- गट विकास अधिकारी, **चिपळूण, ता. चिपळूण** यांना माहितीसाठी...

प्रत :- उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग **चिपळूण, ता. चिपळूण** यांचकडे

**२/- सदर कामाची जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेबाबत खात्री करणेत यावी. मक्तेदार यांनी उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे विमा उतरविल्याची खात्री केले नंतरच कामाची माहिती व आखणी करुन दयावी. कामाचे प्रगतीकडे लक्ष द्यावे वरील सुचनाचे तंतोतंत**